**महाराष्ट्र शासन**

क्रमांकःआस्थापना-२०११/२४४३/प्र.क्र.५३६/म-१.

महसूल व वन विभाग,
मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- ४ मे, २०१२

विषय :- नोंदणी व मुद्रांक विभागांतर्गत असलेल्या दुय्यम निबंधक, सह जिल्हा निबंधक व नोंदणी उपमहानिरीक्षक कार्यालयाच्या जागेचे प्रमाणक वाढविणेबाबत...

संदर्भ :- महसूल व वन विभाग ज्ञापन क्र.आस्थापना-२००३/२१२२/प्र.क्र.४८१/म-१, दिनांक २४/५/२००५

**ज्ञापन :-**

नोंदणी महानिरिक्षक व मुद्रांक नियंत्रक महाराष्ट्र राज्य पुणे यांचे पत्र क्र.का.९/आस्था-७/कार्या.जागा/६७७/११, दिनांक २१/१०/२०११ च्या संदर्भात विज्ञप्तीपूर्वक कळविण्यात येते की, नोंदणी व मुद्रांक विभागाच्या दुय्यम निबंधक कार्यालयांसाठी एकुण १०६५ चौ.फूट जागेच्या प्रमाणकास शासन संदर्भाधीन ज्ञापनान्वये मंजूरी देण्यात आलेली आहे. तथापि, बदलत्या परिस्थितीत वाढलेले अभिलेख, करदाते, पक्षकार यांना अधिक चांगल्या सोयीसुविधा देण्यासाठी तसेच संगणक संच, सामुग्री व ऑपरेटर इत्यादीसाठी उपलब्ध क्षेत्र अपुरे पडत असल्याने दुय्यम निबंधक कार्यालयासाठी जागेच्या एकूण २००० चौ.फूट इतक्या सुधारीत प्रमाणकास शासन मंजूरी देण्यात येत आहे.

तसेच नोंदणी व मुद्रांक विभागांतर्गत जिल्हा स्तरावरील सह जिल्हा निबंधक व विभागीय स्तरावरील नोंदणी उपमहानिरीक्षक कार्यालयासाठी अनुक्रमे ३००० चौ.फूट व ३०१० चौ.फूट याप्रमाणे जागेच्या सुधारित प्रमाणकास यान्वये शासन मंजूरी देण्यात येत आहे.

सदर ज्ञापन सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.२-अ/मि.व्य.१, दिनांक ०९/०१/२०१२ तसेच वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.१४५/२०१२/व्यय-१०, दिनांक २४/०४/२०१२ अन्वये प्राप्त सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( किसनराव पलांडे )
कार्यासन अधिकारी
महसूल व वन विभाग.

**प्रतिलिपीः-**

नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे.
सर्व नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक
सर्व सह जिल्हा निबंधक
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र - १/२, मुंबई/नागपूर
महालेखापाल (लेखा परीक्षा) महाराष्ट्र - १/२, मुंबई/नागपूर
सार्वजनिक बांधकाम विभाग(इमा-३), मंत्रालय, मुंबई
वित्त विभाग (व्यय-१०), मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
निवड नस्ती म-१ कार्यासन

D:\MADHURI\KatkarDynapan.lwp